'गुन्हेगारांसाठी संविधान ढाल ठरू शकत नाही'

खटल्याच्या विलंबामुळे जामिनास न्यायालयाचा नकार

'वैयक्तिक स्वातंत्र्यापेक्षा समाजहिताला प्राधान्य'

तुषार धारकर, लोकसत्ता

नागपूर : गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आरोपीला केवळ खटल्यातील विलंबाच्या आधारावर जामीन देता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. 'हिस्टरीशीटर' आरोपींसाठी संविधानातील कलम २१ अंतर्गत असलेला वेगवान सुनावणीचा अधिकार हा एकमेव आधार ठरू शकत नाही. तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या संविधान ढाल ठरू शकत नाही, असे स्पष्ट निरीक्षण न्या. एम. नेर्लीकर यांच्या खंडपीठाने नोंदवले.

चंद्रपूरमधील रामनगर पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या २०२४ मधील हत्या प्रकरणात आरोपी स्वप्निल चंद्रकांत काशीकर याने जामिनासाठी अर्ज केला होता. मृत शिवा हा काही काळ आरोपीकडे केत्रांटी काम करत होता. त्यानंतर आर्थिक व्यवहारांवरून दोघांमध्ये वाद झाला. २५ जानेवारी २०२४ रोजी शिवाला कार्यालयासमोर बोलावून त्याच्यावर काशीकरने चाकूने हल्ला केला आणि उपचारादरम्यान शिवाचा मृत्यू झाला, असा आरोप आहे. या प्रकरणात पोलिसांनी २६ जानेवारी २०२४ रोजी काशीकरला अटक केली. आरोपीतर्फे न्यायालयात असा दावा करण्यात आला की, आरोपपत्र दाखल झाले असले तरी अद्याप आरोप निश्चित करण्यात आलेले नाहीत. दोन वर्षे चार महिने तुरुंगात राहूनही खटल्याची सुनावणी सुरू न झाल्याने संविधानातील कलम २१ अंतर्गत असलेल्या वेगवान सुनावणीच्या अधिकाराचे उल्लंघन झाले आहे. मात्र, सरकारी पक्षाने आरोपीविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या दहा गुन्ह्यांची नोंद असल्याचे निदर्शनास आणले.

न्यायालयाने निर्णयात नमूद केले की, वैयक्तिक स्वातंत्र्य हा महत्त्वाचा घटनात्मक अधिकार असला तरी तो निरंकुश नाही. एखाद्या व्यक्तीचे स्वातंत्र्य समाजाच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक ठरत असेल, तर समाजहिताला प्राधान्य द्यावे लागते. आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभूमी, त्याचे वर्तन, गुन्ह्यांचे गांभीर्य आणि समाजावर होणारा परिणाम हे घटक जामीन देताना महत्त्वाचे ठरतात. केवळ दीर्घ कारावास हा जामिनाचा एकमेव आधार ठरू शकत नाही. आरोपीला यापूर्वी न्यायालयाकडून अनेकदा जामीन मिळाला; मात्र त्याने पुन्हा गंभीर गुन्हे केले. त्यामुळे तो कायद्याचे पालन करणारा व्यक्ती नाही आणि समाजासाठी धोकादायक ठरत आहे, असे नमूद करत न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला.



बीअरच्या किमतीत पाच रुपयांची वाढ

महसुलात दोन महिन्यांत १११ कोटींची वाढ

सुहास सरदेशमुख, लोकसत्ता

छत्रपती संभाजीनगर : बीअरसाठीच्या काचेच्या बाटल्यांच्या उत्पादनात गॅस तुटवड्यामुळे मोठ्या अडचणी येत असल्या तरी बीअरविक्री आणि राज्य उत्पादन शुल्क वसुलीत मात्र गेल्या दोन महिन्यांत वाढ नोंदवण्यात आली आहे. मात्र, बहुतांश कंपन्यांनी बीअरच्या विक्री किमतीमध्ये पाच रुपयांची वाढ केली आहे. मे महिन्यातील उन्हाचा कडाका पाहता बीअरविक्री वाढ होईल, असे मानले जात होते. अशा परिस्थितीत गॅस तुटवड्यामुळे आलेल्या सर्व संकटांवर मात करत एप्रिल आणि मे महिन्यातील राज्य उत्पादन शुल्कामध्ये तब्बल १११ कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

औद्योगिक वसाहतीचा द्रवरूप नैसर्गिक वायुपुरवठा अचानक बंद पडल्याने वाहन उद्योगावर मोठे संकट आले. तसेच बीअर बाटल्यांच्या उत्पादनावर मोठा परिणाम होईल, असा दावा करण्यात आला होता. 'कॅनपॅक' या बाटली आणि 'कॅन' उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या कंपनीने किमान भट्टी बंद करण्यापर्यंत तरी गॅसपुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी केली होती. अचानक गॅसपुरवठा बंद केल्यास काच वितळविण्याच्या भट्टीमध्ये स्फोट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. त्याचा मोठा परिणाम वितरणावर होईल, असे मानले जात होते. काही दिवसांच्या फरकाने भट्टीचा एक भाग बंद करून उत्पादन सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. काचेच्या बाटल्यांची किमत आणि टीनचे भाव वाढल्याने बीअर किमतीमध्ये वाढ करू देण्याची विनंती उत्पादक कंपन्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे केली होती. त्यास मान्यता देण्यात आली असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्काचे अधीक्षक अभिनव बालुरे यांनी दिली.

बीअर उत्पादनातील बहुतांश सर्व कंपन्यांनी त्यांच्या ब्रँण्डमध्ये पाच रुपयांची वाढ केली आहे. गेल्या महिनाभरात उत्पादनावर फारसा परिणाम दिसत नाही. मात्र, विक्री किमत वाढली आहे. राज्य उत्पादन शुल्क वसुलीतही या दोन महिन्यांत मोठी वाढ दिसून आली आहे. गेल्या वर्षी एप्रिल आणि मे महिन्यात ६४८ कोटी रुपये मिळाले होते. यंदा त्या १११ कोटींचे भर पडून एप्रिल व मे महिन्यात ७७९ कोटी रुपये मिळाले असल्याची माहिती अभिनव बालुरे यांनी दिली.

वर्षनिहाय राज्य उत्पादन शुल्क आकारणी (आकडे रुपयांत)

बीअर कंपनीचे नाव	२०२५ - २६	२०२६ - २७
यूबी मिलेनिअम	५०७.३५	२००.६६
बाटलसर्व इं. लि.	६१.०६	८१.०७
व्हीएन वेव पाल्स	१३३.०७	११०.३०
लिलासन्स इंड	१२९.३८	१०५.७९
ए. वी. एन बेव फॉस्टर	४१.४८	१३१.००

वेगवेगळ्या कारणांमुळे उत्पादन खर्चात वाढ झाल्याचे अहवाल कंपन्यांनी दिले होते. साधारणतः प्रतिलिटर दीड रुपयापर्यंत ही वाढ होती. यावर २३५ टक्के शुल्क आकारण्याचे सूत्र ठरलेले आहे. परिणामी बीअरच्या किमतीमध्ये पाच रुपयांपर्यंतची वाढ झाली आहे. मात्र, गेल्या दोन महिन्यांत बीअर विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नात २० टक्के वाढ झाली आहे.

- अभिनव बालुरे, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक

निती आयोगात २९८ सल्लागार, तरुण व्यावसायिक सदस्य!

माहिती अधिकारातून आकडेवारी समोर

महेश बोकडे, लोकसत्ता

नागपूर : देशाच्या विकासविषयक धोरणांवर काम करणाऱ्या निती आयोगात सदस्य म्हणून सध्या २९८ सल्लागार आणि तरुण व्यावसायिक कार्यरत असल्याची माहिती माहिती अधिकारातून समोर आली आहे. हे सर्व कर्मचारी कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात आले आहेत.

नागपूरचे सामाजिक कार्यकर्ते संजय थुल यांना माहिती अधिकार कायद्यांतर्गत निती आयोगाचे अवर सचिव तथा केंद्रीय जनमाहिती अधिकारी अश्विन वर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार ३ जून २०२६ रोजी आयोगात १४२ सल्लागार आणि १५६ तरुण व्यावसायिक असे एकूण २९८ सदस्य कार्यरत होते. या सल्लागार आणि तरुण व्यावसायिकांचा नियमित कर्मचारी वर्गात समावेश होत नाही. त्यांची नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर करण्यात आली आहे. आयोगाच्या ७ जुलै २०२३ रोजीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मंजूर सदस्य संख्या ४५० आहे. त्यापैकी सध्या २९८ पदांवर सदस्य कार्यरत असून उर्वरित १५२ पदे रिक्त असल्याचे थुल यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर आयोगाच्या सदस्य रचनेसंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बदल करण्याची मागणी करण्यात येत आहे.

पंतप्रधानांना निवेदन

निती आयोगासारख्या महत्त्वाच्या संस्थेत कंत्राटी सल्लागार नियुक्तीची पद्धत चुकीची आहे. त्यातून गोपनीय माहितीच्या सुरक्षिततेचा प्रश्न उद्भवू शकतो. त्यामुळे केंद्र सरकारच्या विविध विभागांमध्ये नियमित पदभरतीला प्राधान्य देण्यात यावे आणि युवकांसाठी अधिक रोजगारच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करणारे निवेदन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ई-मेलद्वारे पाठवण्यात आल्याची माहिती असोसिएशन ऑफ सोशल अँण्ड आरटीआय ॲक्टिव्हीस्टचे (एएसआरए) अध्यक्ष संजय थुल यांनी दिली.

टीसीएस प्रकरणातील संशयितांना इस्लाम पक्षाकडून कायदेशीर मदत

नाशिक, मालेगाव : नाशिकच्या टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्याचे लैंगिक शोषण आणि सक्तीच्या धर्मांतराच्या प्रकरणाला आता राजकीय वळण मिळाले आहे. या प्रकरणातील एक संशयित दानिश शेख याला मालेगावच्या इस्लाम पक्षाने कायदेशीर बळ दिले. शुक्रवारी नाशिकारोड न्यायालयात झालेल्या जामीन अर्जावरील सुनावणीदरम्यान इस्लाम पक्षाने दानिशसाठी स्वतंत्र वकिल दिला. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत संघर्ष करण्याची तयारी पक्षाने संस्थापक व माजी आमदार आसिफ शेख यांनी दर्शविली आहे.

टीसीएस प्रकरणात देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल लैंगिक अत्याचार व धर्मांतराच्या प्रवत्न प्रकरणात पोलिसांनी संशयित दानिश शेख, तौसिफ अत्तार आणि निदा खान यांच्याविरोधात दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. संशयितांनी संगनमताने पीडितेचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण केले. पीडितेचे 'हनिया' असे नामकरण करून तिला बुरखा घालणे, रोजा ठेवणे आणि नमाज पठणाची सक्ती करण्यात आली. या प्रकरणात पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर संशयित न्यायालयीन कोठडीत आहेत. त्यांच्या जामीन अर्जावर शुक्रवारी बचाव पक्षातर्फे युक्तिवाद करण्यात आला. यावेळी दानिशच्या वतीने इस्लाम पक्षाने नियुक्त केलेले ॲड. फैजान वासिफ यांनी बाजू मांडली.

कृषि उत्पन्न बाजार समिती,हिंगणघाट,जिल्हा वर्धा

ई-निविदा सुचना

ई-निविदा क्र.बांधकाम 2/2026-27 दिनांक 13/06/2026

कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगणघाटचे छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड येथे करावयाच्या एकरीत **रु.3,58,37,265/-** रुपयाचे विविध विकास कामाचे अनुशंगाने कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगणघाट द्वारा योग्य त्या वर्गातील महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कंत्राटदारकडून बी-1 नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक 15/06/2026 पासुन पहावयास उपलब्ध आहे.

टिप : 1) वरील कामाची निविदा प्रकीया संगणकावर ई-निविदा प्रकीयेद्वारे ऑनलाईन करण्यात येईल. तसेच वरील कामाची माहिती तथा अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
2) उपरोक्त कामाचे अनुशंगाने के कंत्राटदार निविदा पुर्ण सभेला हजर राहतील त्यांचीच ई-निविदा ग्राहय धरण्यात येईल.

अॅड. सुधिर कोठारी — सभापती, कृ.उ.बा.स.हिंगणघाट
मधुसुदन हरणे — सभापती बांधकाम उपसमीती
टि.सी.चांभारे — सचिव

EMPLOYMENT NOTICE

Krishak Education Society's

Arts, Commerce and Science College

Arvi Dist.- Wardha 442201

NAAC "B" Grade

WALK - IN-INTERVIEW

For Contributory teachers (Grant in- Aid Courses) Vide Joint Director, Higher Education, Nagpur Region N-O-C Letter क्रमांक:उशिवाग/पदना/सीएचबी/ना.प्र.उ./ई-3309081/2026 दि. 11.06.2026.

Interviews for the post of Contributory Teachers (on purely Clock-hour-basis) for the session 2026-27 will be held on **Friday 19th JUNE 2026** as per the schedule given below.

Sr. No.	Subject	No. of Posts	Time
1	Home Economics	01	10.00 A.M.To 12:00
2	History	02	10.00 A.M.To 12:00
3	Commerce	06	11.00 A.M.To 01:00 PM
4	Mathematics	01	11.00 A.M.To 01:00 PM
5	Chemistry	02	12.00 To 02:00 PM
6	Physics	02	12.00 To 02:00 PM
7	Botany	02	12.00 To 02:00 PM
8	Zoology	02	12.00 To 02:00 PM
9	Computer Science	06	12.00 To 02:00 PM

Qualification and Remuneration : NET/ SET/ Ph.D. As per norms of UGC, Govt. of Maharashtra and RTM Nagpur University Nagpur.

Interested Candidates should appear for the interview along with Application, Resume, Original documents, two passport Photos and two sets of Photocopies of documents.

Principal — **Arts, Commerce & Science College, Arvi Dist. Wardha**
President — **Krishak Education Society Arvi Dist. Wardha**

HDB FINANCIAL SERVICES

जीडीपीकुंज कार्यालय: तळमजला, दुसरा मजला, लॉ गार्डन रोड, नवरंगपुरा, अहमदाबाद, गुजरात, पिन कोड-380009

कब्जा कार्यालय: पहिला मजला, शिवाय हाऊस, शिवाय हॉस्पिटल जवळ, जुना नागपाडा रोड, आंबोली सबवे जवळ, अंधेरी (पू), मुंबई 400069 आणि त्यांच्या महाराष्ट्रातील विविध शाखा

सर्फेसी अधिनियम, 2002 मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना

आदरणीय, नमाने खाली नमूद कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदारांनी एचडीबी फायनॅन्शियल सर्व्हिसेस लिमिटेड यांचेकडून आपल्या अचल मालमत्ता (अनमती) तारण ठेवून कर्ज सुविधा मोठ्तल्या अमृत आणि त्यावर विशेष न पडताळ सार कर्जाच्या परतफेडीचा करुन घेतलेले आहे. आपण कडून कर्ज घेतलेले असल्याने आपले कर्ज तपशील सह कर्जाच्या परतफेडीची हमी म्हणुन आपण अंतर्निहित केलेले सुरक्षा हित अनुपालन तसा मानुन कर्ज करण्यात आलेले आहे. एचडीबीफायनान्स यांना सकवाकी रकमेची वसुली करण्याचा अधिकार असुन त्यांनी आता सिक्युरीटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (सरफेसी ॲक्टविरुध्द) मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना पाठविलेली असुन तीचमधील मजकुर सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3(1) सह वाचण्याचा नेणारा सार अधिनियमातील अनुच्छेद 13(2) नुसार आपणांस देण्यात येणारी पावती सेवा म्हणुन येथे प्रकाशित करण्यात येत आहे. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार, कर्जे, अगमनी, थकबाकी रक्कम, अनुच्छेद 13(2) अंतर्गत पाठविण्यात आलेली मागणी सूचना आणि त्यात मागणी करण्यात आलेली **खाल** इ. तपशील खाली देण्यात आलेला आहे:

1. कर्जदार व सह-कर्जदार : 1. भारत इंजिनियरिंग, फर्नीचर क्र. 230, सर्वांसी नगर, लिंक रोड, दिघोरी, जिल्हा सोनवाडी, तिरपाणी कॉम्प्लेक्सच्या मागे, नागपूर - 440034, नागपूर. 2. अमरसरदान मानीन खान (मृत) (कायदेशीर वारसांचाकरीता) ब) हिकजन रहमान अमरसर खान (कायदेशीर वारस) क. फर्नीट क्र. 230, सर्वांसी नगर, लिंकरोड लेआऊट, लिंक रोड, दिघोरी, जी.टी.सी. बोस्ता, पी.ओ. दिघोरी, जि. नागपूर, महाराष्ट्र - 440034. ब) इकबीरा रहमान अमरसर खान (कायदेशीर वारस) ए. अहीक्षा कोसर मोतिउर्रहमान, फर्नीट क्र. 230, सर्वांसी नगर, लिंकरोड लेआऊट, लिंक रोड, दिघोरी, जी.टी.सी. बोस्ता, पीओ. दिघोरा, जि. नागपूर, महाराष्ट्र - 440034. क) झुबेर अमसर खान (कायदेशीर वारस) ए. अहीक्षा कोसर मोतिउर्रहमान, फर्नीट क्र. 230, सर्वांसी नगर, लिंकरोड लेआऊट, लिंक रोड, दिघोरी, जी.टी.सी. हुडकेन खुर्द, पीओ. दिघोरा, जि. नागपूर, महाराष्ट्र - 440034. 3) अंजिरीन, पत्नी रजाज खान (कायदेशीर वारस) ए. सर्वांसी नाता सर्वी, नागपूर, जि. नागपूर, महाराष्ट्र - 441201. 3) सानिया, पत्नी सलीम खान (कायदेशीर वारस)ए. 08/549, चॉर्ड क्र. 06, जयुपाल नगर, जी.टी.सी. नागपीठ, पी. नागपीठ, जलिलता नागपीठ, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र - 441205. 3. हिकजुहमान अमरर खानचॉर्ड क्र. 230, सर्वांसी नगर, लिंक रोड, दिघोरी, नागपूर - 440034, महाराष्ट्र. 4. अरेफा हिकजुहमान खान फर्नीट क्र. 230, सर्वांसी नगर, लिंक रोड, दिघोरी, नागपूर - 440034, महाराष्ट्र. 2) कर्ज खाते क्रमांक: 30221252 3) कर्ज खाते : 57,65,178/-(रुपये सत्तावन लाख पासट हजार एकशे अठ्ठ्याहत्तर फक्त) 4) सुरक्षित मालमत्तेचे तपशील :तहसील मालमत्ता :मौजा दिघोरी, ता. व जि. नागपूर, नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत स्थित, खसरा क्र. 64, फर्नीट क्र. 23.0एस च्या एकत्रिकरीकरण भागासह त्याखील बांधकामासुन यत, पूर्व-पश्चिम लांबी 50 फूट (12.240 मीटर) व उत्तर-दक्षिण रुंदी 25 फूट (7.620 मीटर), एकूण क्षेत्रफळ 1250 चौ.फूट (116.1225 चौ.मीटर), पी.एन. क्र. 34, के.एन. क्र. 64, जिल्हा नुद्र निर्माण संस्था, मौजा दिघोरी, तहा. जिल्हा नागपूर, नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत. चतुःसीमा :उत्तर : फर्नीट क्र. 230 या अर्धा भाग, जो सौ. हमीदाची यांनी खोरी केलेला आहे.दक्षिण : जिल्हा नुद्र निर्माण संस्था यांची मालमत्ता.पूर्व : जिल्हा नुद्र निर्माण संस्था यांची मालमत्ता.पश्चिम : 50 फूट रुंद सेल. 5) मागणी सूचना दिनांक : 27.05.2026 6) देय एकूण रक्कम : रु. 64,66,099/-(रुपये चौसष्ट लाख सहा हजार एकनव्वद फक्त) दिनांक 27.05.2026 रोजी देय असुन, त्यावर प्रत्यक्ष वसुलीपर्यंत करारनुसार परिवर्तनीय व्याज तसेच अनुषंगिक खर्च, शुल्क व इतर आकार लागु राहतील.

2. **1. कर्जदार व सह-कर्जदार : 1. ओम साई ट्रेडर्स ॲंड ट्रान्सपोर्ट** प्रविण नगर, बी.एस.बी., अमरावती - 444604, महाराष्ट्र. 2. **बाळा मदन यादव** प्रविण नगर, राम सी-आऊट, अमरावती - 444604, महाराष्ट्र. 3. **अमन मदन यादव** प्रविण नगर, राम सी-आऊट, बी.एस.बी., अमरावती - 444604, महाराष्ट्र. 4. **आरती मदन यादव,** प्रविण नगर, राम सी-आऊट, बी.एस.बी., अमरावती - 444604, महाराष्ट्र. 2) **कर्ज खाते क्रमांक:** 17208746 3) **कर्ज रक्कम (रु. 35,46,027/-(रुपये पंचतीस लाख सेहेचाळीस हजार सत्तावीस फक्त.) 4) सुरक्षित मालमत्तेचे तपशील :** तहा: महानगर : जिल्हा: सर्वांसी क्र. 36/3, बेस क्र. एलएपी-34, लायडोग-12, क्षेत्र 1995-1996, फर्नीट क्र. 8अ, बेडरूमच 1448 चौ. फूट तसेच फर्नीट क्र. 7ब, बेडरूमच 1423 चौ. फूट, सरप फर्नीट क्र. 7ब मधील पूर्व-पश्चिम विस्तारलाच उत्तरेकडील भागापुरा 711.5 चौ. फूट बेडरूमच व एकूण 2159.5 चौ. फूट बेडरूमच्यासह त्यावरील निवासी घर, मौजे लायडोग, प्रगने नाजायत पेठ, ता. व जि. अमरावती, महाराष्ट्र - 444604. सद्य:स्थिती :उत्तर : फर्नीट क्र. 8अ, दक्षिण : फर्नीट क्र. 7ब या उर्वरित भाग, पूर्व : इतर रो-आऊटबॉक्स : रस्ता 3) **मागणी सूचना दिनांक 27.05.2026 6) देय एकूण रक्कम (रु. 22,85,027.82/-(रुपये बावीस लाख पंचाऐंशीशी हजार सत्तावीस आणि ब्याऐंशी पैसे फक्त)दिनांक 27.05.2026 रोजी देय असुन, त्यावर प्रत्यक्ष वसुलीपर्यंत करारनुसार परिवर्तनीय व्याज तसेच अनुषंगिक खर्च, शुल्क व इतर आकार लागु राहतील.**

1. वाहते कर्जदार व सह-कर्जदार/जामीनदारांना सदर सुचनेच्या दिनांकापासुन 60 दिवसांपर्यन्त ओत वर मागणी करण्यात आलेल्या संपुर्ण रक्कमेचे पुढील व्याजासह परतफेड करण्याचे आवाहन करण्यात येते, अन्यथा एचडीबीफायनान्स त्या प्राधिकृत अधिकारांकन नाहीतानासन वर मागुन करण्यात आलेल्या अजमनीविकृत कार्यावई करायी लागेल. कृपया लक्षात घ्यावे की सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(13) अन्वये 2. नमानकारांना एचडीबीफायनान्स या संस्थेविरुध्द सर मागुन अजमनीविक्री, भाडेपट्टी निरस्त ओर व्यवसाय किंवा इतर कोणत्याही पद्धतीने हस्तांतरण करण्यास मनाई करण्यात येते. 3. कोणत्याही चौकशीसाठी किंवा संपूर्ण भरणासाठी कृपया एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड ये श्री. मयूर शिमलेकर, संपर्क क्र. 9890951567 (संकलन व्यवस्थापक) किंवा ओंकार श्रीकांत जोशी, संपर्क क्रमांक: 7020954765 वर संपर्क साधावा.

स्थान: नागपूर / अमरावती
दिनांक: 13/06/2026
स्वा/- एचडीबीफायनान्स करिता
प्राधिकृत स्वाक्षरीकार

बँक ऑफ इंडिया
भारत बॅंकिंग पलिकडचं

आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,सुमती पॅलेस, महावीर उद्यान समोर रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : ard.vldarbha@bankofindia.bank.in

सरफेसी ॲक्ट 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तांची मेगा स्टार ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 8(2) च्या तरतुदीसह वाचण्यात आलेल्या नियमांतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषतः खालील कर्जदारांना/सह-कर्जदारांना/जामीनदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांची त्यांचा सांकेतिक आणि भौतिक ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्वावर आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित मालमत्ता तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदार/जामीनदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी (प्रत्येक सुरक्षित मालमत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 09/07/2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत

(समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सवर झाल्यास बोलीच्या मुदत वाढीच्या अटीसह)

(मालमत्तेच्या तपासणीची विनंती **ARD.Vldarbha@bankofindia.bank.in** या ई-मेल आयडीवर आणि /किंवा श्री शुभम मस्के मो. 8237771144, श्री स्वप्नील अग्रवाल मो.8888334383 यांच्याशी संपर्क साधून करता येईल.)

	संपत्तीचे विवरण	एकुण थकबाकी	ताबा प्रकार	लिलावाची सुरुवातीची किंमत रु.	अनामत रक्कम (ईएमडी) रु.
कर्जदार/गहाणदार : श्री रविंद्र मनोहर सांकुलवार BKIDGONDRAVINDRA शाखा:गोंडपिपरी	जागेचा सर्व भाग आणि तुकडा खुला एनए प्लॉट नं.77, सर्वे नं.189 भाग, मौजा वेकटपुर, तह.गोंडपिपरी, जि.चंद्रपूर -442702, अंदाजे आरजी 166.50 स्के.मि. (179.54 स्के.फीट) श्री रविंद्र मनोहर सांकुलवार (कर्जदार/ गहाणदार) यांच्या नावाने.	रु. 06.04 लक्ष + एनपीए च्या तारखेपासून युजीआय + इतर आनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 5,43,000/-	रु. 54,300/-
कर्जदार/गहाणदार : श्री राजेश नगीह बोल्लु सह-कर्जदार : श्रीमती श्रीलता राजेश बोल्लु जमानतदार: श्री ज्ञानेश्वर लक्ष्मण तुमारकर BKIDWIRURRAJESH शाखा:विरुर	जागेचा सर्व भाग आणि तुकडा तीन मंजिल घर प्रापर्टी नं. 393 (नविन नं.395/1), घर नं.997, बांधकामाशी सर्वे नं. 378, शिट नं.5, मौजा विरुर स्टेशन, तह.राजुरा, जि. चंद्रपूर-442905 क्षिट्र अप्र परिया 432.07 स्के.फीट श्री राजेश नगीह बोल्लु (कर्जदार/ गहाणदार) यांच्या नावाने.	रु. 05.49 लक्ष + एनपीए च्या तारखेपासून युजीआय + इतर आनुषंगिक खर्च	सांकेतिक	रु. 8,24,000/-	रु. 82,400/-

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

1) ई-लिलाव **"जे आहे जेथे आहे, आणि "** जे काही आहे ते आणि **"ज्या स्थितीत आहे तसे आहे"** तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल. इच्छुक बोलीदारांकडे ऑटो रिक्षासाठी वैध नोंदणी प्रमाणपत्र, वैध व्यावसायिक परवाना (वाहतूक श्रेणी-ऑटो रिक्षासाठी), वैध सार्वजनिक सेवा बिल्ला आणि वैध रहिवासी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करन घेण्याशाठी कृपया **https://bankofindia.bank.in** ला भेट द्या.
a) ई-लिलाव सेवा पुरवठा दारांच्या वेबसाईटच्या पत्ता : **https://baanknet.com/.** बोलीदार हे **https://baanknet.com/** येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मागसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील औपचारिकता आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.
टप्पा - 1: बोलीदारांची नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.
टप्पा - 2 : केवायसी पडताळणी- बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.
टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन - ऑनलाईन ने एनईएफटी/हस्तांतरण ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.
टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकाल: इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 ते 4 यर्वतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपुर्वीचे बोलीदारांनी पूर्ण करावेत.

3) अधिकृत अधिका-यांच्या सर्वोत्तम ज्ञात आणि माहिती प्रमाणे, स्थावर मालमत्तांवर कोणताही ऋणभार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांवरील ऋण, नामनिर्देशन आणि दावे /अधिकार, देयी /मालमत्तेला होणारी बाधा याची स्वतंत्रपणे चौकशी, त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी करावी. ई-लिलावाची जाहिरात प्रविध्द होणे म्हणजे कुणाविही वचनबध्दता असणे किंवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजणारे येतू नये. मालमत्तांची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या आणि अज्ञात असलेल्या सध्याचा आणि आगामी बोजासह /भारासह करण्यात येईल. विक्री करण्याचा येणा-या मालमत्तांच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर करण्यात आल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दाव्याचा विचार केला जाणार नाही.

4) बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या संदर्भात पाहणी करुन स्वतःची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. देयातील आलेल्या तपशिलाच्या अनुसार अंबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन मालमत्तेची पाहणी करता येईल. स्थावर मालमत्तांच्या पाहणीसाठी दिनांक : **22.06.2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत** असुन पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी.

5) बोली केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात याव्यात.

6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.

7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असावी आणि बोलीदारांनी आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.

8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परतावा करण्यात येईल.

9) बँकांच्या प्र

लघुकथा

■ केतकी विद्वांस

भेट

बंगळूरुमध्ये नवरा-मुलांसोबत संसारात रमलेल्या मधुराला पुण्यात राहणाऱ्या तिच्या आईची आज खूप आठवण येत होती. आईचा आज साठावा वाढदिवस असल्याचं लक्षात आलं नि तिला आपण पुण्यात नसल्याची खंत वाटली. त्यात मिहिरने आजच्या निवांत रविवारी अचानक पाहुणे येणार असं सांगितल्यावर ती जरा हिरमुसूनच कामाला लागली...

सकाळी लवकरच मधुराला जाग आली. आज तशी फार घाई नव्हती. रविवार होता. मुलांना आणि मिहिरला सुट्टी होती. 'नेमकी सुट्टीच्या दिवशी लवकर जाग येते,' असं स्वत:शीच बोलून मधुराने परत पांघरुणात डोकं खुपसलं. पण काही केल्या झोपच येत नव्हती. त्यात मस्त थंडी पडली होती. तिचं मन तिला लहानपणीच्या थंडीतल्या आठवणीत घेऊन गेलं...

तिला तिच्या लहानपणीची पुण्यातली थंडी आठवली, सकाळच्ची शाळा असायची. मराठी शाळेत साधारण पहिली-दुसरी इयत्तेत ती असेल. प्रचंड कंटाळा यायचा तिला शाळेत जायचा. तिची आई तिला हाका मारून मारून उठवायची. ती कंटाळत्तच उठायची आणि आवरून शाळेत जायची. रोजच चालत जावं लागायचं शाळेत, त्यात कडाक्याची थंडी असली की मग तिच्याकडच्या लाल रंगाचा स्वेटर बाहेर पडायचा. तो घालून कुडकुडतच ती आईला बिलगून शाळेत जायची... तिला आईची ऊब आठवली आणि भरून आलं. आज तिला आईची खूप आठवण येऊ लागली.

मधुरा आणि मिहिर दोघेही आपल्या मुलांसोबत बंगळूरुला राहत होते. मिहिर एका प्रतिष्ठित आयटी कंपनीत मोठ्या पदावर नोकरीला होता. तो मूळचा पुण्याचा. त्याचे आई, बाबा, भाऊ, वहिनी पुण्यात राहत होते. मधुराही पुण्याचीच. या दोघांचं महाविद्यालयात प्रेम जमलं. दोघांच्या घरून संमती होतीच, त्यामुळे लग्नसुद्धा लगेच झालं. मधुरा लग्नाआधी आणि नंतर नोकरी करत होती; पण लग्नानंतर एक वर्षात मिहिरची बंगळूरुला बदली झाली आणि मधुरासुद्धा तिची नोकरी सोडून तिथं आली, नंतर पार्थ झाला आणि तीन वर्षांनी सानिका. मुलांकडे दुर्लक्ष नको म्हणून तिनं नोकरी न करण्याचा निर्णय घेतला होता. आज ती तिच्या संसारात आनंदी होती...

झोप येणार नाही, हे लक्षात घेऊन अखेर ती उठली. मुलांचं पांघरूण नीट करून, त्यांच्याकडे आणि मिहिरकडे तिनं प्रेमानं बघितलं. 'सुख म्हणजे नक्की काय असतं?' तिनं स्वत:ला प्रश्न विचारला, ''आता आपण जे बघतोय त्यालाच सुख असं म्हणतात ना! दोन गोंडस मुलं, आपल्यावर प्रेम करणारा नवरा, आणखी काय हवं?'' असं स्वत:शी म्हणत मधुराचं चहा ठेवला. चहा घेत घेत मोबाइल फोन बघताना तिच्या लक्षात आलं,''अरे आज २६ नोव्हेंबर, आज आईचा साठावा वाढदिवस. तरीच आईची इतकी आठवण येत होती!'' गेल्या दीड वर्षात मधुराला पुण्यात जायला मिळालं नव्हतं. फोनवरच काय ते आई आणि बाबांशी बोलणं होत होतं. त्यात मधुरा एकुलती एक होती. त्यामुळे तिला आपल्या आई-बाबांची प्रत्यक्ष काळजी घेता येत नाही, त्यांना वेळ देता येत नाही, याचं वाईट वाटत असे. तसे, तिचे सासू-सासरे दीर, जाऊ पुण्यातच होते. सासूबाई तिला सांगायच्या, ''अगं काळजी करू नकोस... आम्ही आहोत, गरज वाटेल तेव्हा बघू तुझ्या आई-बाबांना...''

तिचं मन खट्टू झालं. आज आपण असतो तिथं तर आईचा वाढदिवस साजरा केला असता, तिच्या मनात येत होतं. जरा वेळाने मिहिर उठला. तयार झाल्यावर बाहेर येऊन त्यानं मधुराकडे चहाची फर्माईश केली. मधुरा चहा घेऊन बाहेर आली. ''अरे मिहिर, आज काय आहे माहीत आहे ना? आज आपण सगळ्यांनी पुण्यात असायला हवं होतं.''

''काय आहे गं आज?'' मिहिरने विचारलं.

''अरे आज आईचा साठावा वाढदिवस. तू विसरलास का?''

''अरे हो! विसरलो होतो मी, करू या फोन नंतर आईना. अगं ऐक ना, आज काही तरी मस्त कर जेवायला, माझा एक मित्र त्याच्या कुटुंबासोबत येणार आहे.'' मिहिरनं सांगितलं.

''अरे मिहिर, असं अचानक काय सांगतोस? आधी सांगता नाही आलं का तुला? तशी तयारी केली असती मी आधीच,'' मधुरा म्हणाली.

''अगं हो, अचानक ठरलं त्यांचं. प्लीज नाही नको म्हणूस. मी आधीच सांगून ठेवलंय त्यांना.''

असं कसं केलं मिहिरनं आपल्याला न सांगता? त्यात आज रविवार. जरा आराम केला असता. नाही तर आठवडाभर असतेच धावपळ. मिहिरचं ऑफिस, मुलांची शाळा, डबे, त्यांचे क्लास. जरा निवांत वेळ मिळत नाही. जराशी नाराज होऊन स्वत:शी पुटपुटत मधुरा स्वयंपाकघरात शिरली.

मिहिरने हाक मारून मधुराला सांगितलं, ''मधुरा, आपलं नेहमीचं जेवण कर गं. आमटी, भात, बटाटा भाजी, कोशिंबीर, चटणी, भजी, पुरी.''

''अजून नको का काही?'' मधुरा आतून फणकाऱ्याने म्हणाली. मिहिर हसत आत येऊन म्हणाला, ''अगं रागावू नकोस ना प्लीज. मी पुढल्या रविवारी तुला बाहेर नेईन जेवायला, मग तर झालं?''

''ठीक आहे रे, जरा गंमत केली,'' मधुरा हसत म्हणाली. ''किती वाजता येणार आहेत सर्व जण? तशी तयारी करावयला,'' असं बोलून मधुराने बटाटे उकडत लावले. एकीकडे पुरीचं पीठ भिजवलं.

''अगं मधू, गोड काही करू नकोस, ते येताना गुलाबजाम घेऊन येणारेत. ते सर्व जण दीड वे दोनपर्यंत येतील, त्याआधी सर्व जेवण तयार ठेव,'' मिहिरने मधुराला सांगितलं.

''बरं ठीक आहे,'' असं म्हणून मधुरा कामाला लागली.

''अरे मिहिर, मुलांना आणि आपल्यासाठी काही तरी नाश्ता घेऊन ये. कारण आता मला नाश्ता बनवत बसायला वेळ नाहीये.''

''बरं आणतो,'' असं म्हणून दहा मिनिटांत मिहिर बाहेर पडला आणि चविष्ट समोसे घेऊन आला.

काही वेळानं ''मी जरा बाहेर जाऊन येतो गं, एक काम आठवलं,''असं मधुराला सांगून तो बाहेर पडला. ''आता याला कुठलं काम आठवलं असेल?'' असं मधुराला वाटून गेलं. ती काही विचारणार तेवढ्यात मिहिर बाहेर पडलाही. दरम्यान, तिचं जेवण तयार करून झालं. आता पाहुणे येणार आहेत तर झालेला अवतार बदलून जरा तयार होऊ यात, असं म्हणत मधुराने तयारी करायला सुरुवात केली.

साधारण १ वाजता बेल वाजली. ''अरे बाप रे, आले वाटतं पाहुणे, मिहिर कसा आला नाही अजून?'' असं पुटपुटत मधुराने दार उघडलं तर दारात आई, बाबांना बघून तिला सुखदाश्चर्याचा धक्काच बसला. अत्यानंदानं मधुरा ओरडली, ''आई, बाबा, तुम्ही आत्ता इथं अचानक कसे काय?''

''अगं त्यांना आत तर येऊ दे!'' मिहिर सासू-सास्र्यांचं सामान घरात ठेवत म्हणाला, आई-बाबा घरात आल्यावर मधुरा आईला बिलगली. ''आई किती आठवण येत होती तुझी, आज अचानक कशी आलीस? आणि मिहिर कुठे भेटला तुम्हाला? मिहिर, अरे तुझा मित्र येणार होता ना, ते कुठं आहेत?''

''अगं, आम्हीच येणार होतो, कोणी मित्र वगैरे येणार नाहीये. ही मिहिरचीच कल्पना होती. आम्हाला आठ दिवसांपूर्वी फोन करून आज यायला सांगितलं, आमची विमानाची तिकिटं त्यानेच बुक केली होती. तो म्हणाला, 'मधूला आठवण येतेय खूप तुमची, आईचा वाढदिवस आहे. तुम्हीच इकडे या मधूला सरप्राईझ देऊ. मग काय बॅग भरली आणि आलो इकडे.'' मधुराच्या बाबांनी गुपित उलगडलं.

''चला तर, सेलिब्रेशनची तयारी करू या, आज रात्री मस्त बाहेर जायचं जेवायला. एक छानसा स्ट्रॉबेरी केक मधुराजवळ देते मिहिर म्हणाला, ''चला आई, आता केक कापून घ्या.''

''मिहिर, आज आईचा वाढदिवस आणि सरप्राईज मलाच मिळालं,'' मधुरा मिहिरचा हात हातात घेत म्हणाली.

''आई, काय गिफ्ट देऊ तुला आज?'' केकचा तुकडा भरवत मधुराने आईला विचारलं.

''अगं मिहिरने दिलीय मला वाढदिवसाची भेट. मधुरा, आज मला तू भेटलीस, माझी नातवंडं भेटली आणि मुलासारखी काळजी करणारा जावईं भेटला. आजच्या माझ्या साठाव्या वाढदिवसाची यापेक्षा आणखी चांगली भेट काय असू शकते?... असं म्हणताना आईच्या चेहऱ्यावर कमालीचं समाधान होतं.

◆ vidwans.ketaki88@gmail.com

मनातलं कागदावर

■ भारती महाजन-रायबागकर

कळलंच नाही कधी...

मला आणि यांना नव्हतंच जायचं मुलांसोबत... आवडीने घर बांधलं होतं इकडे. जिव्हाळ्याची माणसं होती इथं. पण हे सगळं सोडून मुलांसाठी आम्ही दोघे गेलोच चेन्नईला. नवीन शहरात राहताना सुरुवातीला मनात होणारी घालमेल काही दिवसांनी संपलीच... कराण चेन्नईमध्ये मला आनंदाचं, सुखाचं असं काही गमक सापडलं की आता ते मी आयुष्यभर लक्षात ठेवेन...!

''आलेच दोन मिनिटांत. अगं हो, येते लगेच. हो, झाला बाई जरासा उशीर... आता तू फोन ठेवलास तर मला पटकन येता येईल नं...''काय बाई या मैत्रिणी... आज जमणार नाही म्हटलं त्यांच्याबरोबर खरेदीला जायला, तर ऐकायलाच तयार नाहीत, पूर्वीपासूनचे अनुभव ऐकून त्यांना ठाऊक झाला होता. ''अरे, पण आपलं हे हौसेनं बांधलेलं मनासारखं घर, ही मेहनतीनं फुलवलेली बाग, आमची मित्रमंडळी, नातेवाईक, किती तरी आठवणी गुंतलेल्या आहेत इथं. हे सगळं सोडून कसं रे यायचं तुमच्याबरोबर? तुमचं ठीक आहे, तुम्हाला बदली झाली तर जावंच लागणार...''

आमच्यासमोर बरीच वर्षं वास्तव्य केलेलं छत्रपती संभाजीनगर किंवा आधारस्तंभ असलेलं माझं नाशिकचं माहेर असे दोन पर्याय होते. पण लेक-सुनेला तेही मान्य नव्हतं.''आम्ही असताना तुम्हा दोघांना सोडून आम्ही तरी का जायचं तिथं? किती काळजी वाटेल आम्हाला. चटकन येताही येणार नाही, काही अडचण आली तर...'' आणि मलासुद्धा माझ्यापेक्षाही यांची काळजी जास्त वाटत होती.

मला आणि यांना चेन्नईचा मुक्काम संपला तर...? हा विचार मनात आला आणि उमगलेलं एक सत्य, शक्य असेल तर, जुन्या आठवणींना अट्टहासानं कवटाळून जगण्यापेक्षा त्यांना जोडाव्यात नवीन आठवणी. वाढवाव आपला मैत्रीचा परीघ. जोपासावेत जुने छंद. नातं जोडावं नवीन छंदांशी... मग आयुष्य होतं सुखकर, सुसह्य... सर्वांसाठीच...!

''आई, कळलंच नाही ना... नाही नाही म्हणता म्हणता इथं किती छान रमलात तुम्ही ते...'' असं म्हणताना लेक-सुनेने सोडलेला समाधानाचा सुस्कारा आणि ते पाहून आपल्या चेहऱ्यावर उमटलेलं मंद स्मित... सगळं सगळं आठवलं...

(आता चेन्नई सोडताना वाटलेल्या संमिश्र भावनांच्या पार्श्वभूमीवर मनातलं आठवांचे हे मोरपीस कागदावर उमटवलं एवढंच...)

◆ bharati.raibagkar@gmail.com

◀ पान १ वरून / ''मी आणि माझ्या मैत्रिणी महिन्यातून एक दिवस तरी 'सेल्फ डेट' करतो. म्हणजे त्या एका दिवशी एकटीने आपल्या आवडत्या ठिकाणी जाऊन हवं ते खावं. त्याचा मनसोक्त आनंद घेतो. फोटो, रील्समधून शेअर करतो. हे खूप महत्त्वाचं वाटतं मला कारण माझ्या आईला इतकी वर्षं मी दिवसाचे १२ तास स्वयंपाकघरात पाहिलं आहे. बऱ्याचदा वेळ नसेल तर एकटीनं उभ्यानं जेवतानाही पाहिलंय. तिला कधीच कोणी सांगत नाही, 'तू आधी जेवून घे.' आपली काळजी आपणच घ्यायला हवी. हे यातून मी शिकले. कधी कधी आईलासुद्धा माझ्यासोबत घेऊन जाते, कारण ती कधी बाहेर एकटी जेवणं शक्य नाही.''

अलिकडेच घरातील पुस्तकांचा ढीग आवरताना एक जुनी डायरी गवसली. ती चाळताना २०२०मध्ये एका ऑनलाइन मीटिंग मधली चर्चा आठवली. त्यात स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचाराच्या विविध पैलूंवर आम्ही चर्चा करत होतो. आपल्याला हवं ते करता येत नसेल तर तीसुद्धा एक प्रकारची हिंसा आहे. यावर अधिक खोल चर्चा सुरू होती. नाशिकमधील 'लोकनिर्णायक' संस्थेचे संस्थापक संतोष सर यांनी एक घटना सांगितली. ती सत्तरीतल्या आजीबद्दलची होती. एकदा सहज त्यांना त्या रस्त्यात दिसल्या, ते सवयीनं आजींना हाक मारणार तेवढ्यातच त्यांनी पाहिलं की, त्या त्यांच्या पदराच्या गाठी सोडवून एक एक नाणी गोळा करून आईस्क्रीमवाल्याला देत होत्या. मग मनासारखं एक आईस्क्रीम घेऊन त्या जवळच्या बाकावर जाऊन बसल्या. आनंदात होत्या. त्यांच्या या आनंदात व्यत्यय नको म्हणून ते पुढे गेले नाहीत. आजींचं आईस्क्रीम खाऊन झाल्यावर मात्र भानावर आल्यासारखं त्यांनी हात झटकून, लगबगीने पदराने तोंड पुसत, कोणी पाहत तर नाहीये ना, असं चोरून बघत उठल्या. आणि आपल्या घराच्या दिशेला निघाल्या. या संपूर्ण घटनेत आईस्क्रीम एकट्याने मजेत खाताना एका लहान मुलीसारखा आनंद लुटणारा आजींचा चेहरा दुसऱ्या क्षणी आपण जे काही करत आहोत ते कोणी पाहिलं नाही ना? या भीतीने कावराबावरा होणे हे संतोष सरांना बुचकळ्यात टाकणारं होतं. 'पण का?' या मलाही पडलेल्या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी २०२६ यावं लागलं. पुस्तक आवरताना आमच्या सोसायटीमधील उषाताई मदतीला आल्या होत्या. त्या सोसायटीमधील साफसफाईची जबाबदारी सांभाळतात. त्यांना हे सांगितल्यावर म्हणाल्या, ''मीसुद्धा आधी भूक मारायचे पण आता नाही. गेली पाच वर्षं एकटीने जाऊन मिसळ पाव, पाणीपुरी जेव्हा जिवाला वाटेल तेव्हा खाते. स्वतःसाठी आपण स्वतः उभं राहायचं, स्वतःच्या जगण्याचा आदर करायचा मगच इतर करतील. हळूहळू लोकसुद्धा आपल्या आजुबाजूच्या लोकांचेही जगणं असतं, त्यांना जगु द्यावं हे समजायला लागतात. पण त्यासाठी सुरुवात स्वतःपासून करावी लागते.

◆ poonamsingh.bisht055@gmail.com

टेबल फॉर वन

म्हणे आम्हाला तुझ्या आवडीनेच साड्या घ्यायच्यात. मग काय करणार? मन कसं मोडणार मैत्रिणींचं? त्यांच्यामुळेच तर झालंय, माझं इथलं वास्तव्य अगदी सुखकर, आनंदी... नाही तर इथं अगदी दूरच्या परभाषिक द्रविड तमिळनाडू प्रांतात राहायची काळजीच वाटत होती. मी म्हणूनही दाखवलं होतं तसं, पण त्यावर सूनबाई म्हणते कशी, ''अहो आई, एकदा आमच्याबरोबर चला तर खरं. नाही आवडलं तुम्हाला तर बघू पुढे काय करावचं ते. पण तुम्हाला आवडेलच, खात्री आहे मला...''

''अगं आई, अधूनमधून येत जा तुम्ही दोघं इथं, विमानानेच तर यायचं-जायचं. मग तर झालं?'' लेकाची पुष्टी. ''आज्जी... मला गोष्ट कोण सांगणार?'' नातवाचं आर्जव.

ते तिघंही नातवाच्या शाळेच्या प्रवेशासाठी दोन महिन्यांपूर्वी इथं येऊन गेले होते आणि जिथं घर घ्यायचं तो सोसायटी पाहून गेले होते. शिवाय 'पानी तेरा रंग कैसा, जिस मे मिलाया वैसा' हा माझा स्वभाव माझ्या मुलांना जर तिथं मित्र नाही मिळाले तर? त्या तमिळ भाषिकांसमवेत कसा मेळ जमेल? आधीच शांत आणि मितभाषी स्वभाव असणारे हे एकलकोंडे तर नाहीत ना होणार? एवढी प्रस्तावना करण्याचं कारण म्हणजे, आता इतक्या वर्षांनंतर हा संवाद आठवला की हसू येतं.

चेन्नईला येण्यासाठी आम्हाला अखेर पांढरं निशाण दाखवावं लागलं होतं. विमनस्क मनानं सामानाची बांधाबांध करत होतो. अधूनमधून मनाला समजावतही होतो. आता जायचं ठरलंच ना, तर मग आनंदानंच जाऊ. पर दिल है की मानता नही... अशीच मनोवस्था होती. मग काय, पोहोचलो एकदाचे इथं. सकाळ झाली. जरासा फेरफटका मारायला बाहेर पडलो आणि हिरवागार परिसर, नेटकी सोसायटी, जवळच छोटंसं रेल्वे स्टेशन, लगतचं छानसं तळं आणि त्यात फुललेली कमळं. शहरातील घरातून क्वचितच, पण इथल्या घरातून रोज दिसणारा सूर्योदय. मन प्रसन्न झालं अगदी. संध्याकाळी सोसायटीच्या बागेत गेले. संथ पावलांनी रमत-गमत स्थानिक ललना-बालकांचं निरीक्षण करत चालले होते. इतक्यात पाठीमागून कुजबूज ऐकू आली. ''नवीन दिसताहेत, आपल्यासारखाच वाटतात...''

''आपल्यासारख्याच...?'' मी गर्रकन वळले आणि त्यांच्यासमोर जाऊन उभी राहिले.

''नमस्कार...! कालच आलोय इथं राहायला.'' आमच्यात संवाद सुरू झाला आणि त्या दिवसानंतर कळलंच नाही कधी हा ओळखीचा सिलसिला जिवलग मैत्रीच्या धाग्यात बांधला गेला ते. आणि आता तर छंदच लागला या मैत्रीच्या साखळीत एकेक कडी जोडण्याचा. जरासे इथल्यापेक्षा वेगळे, आपल्याशी साम्य असलेलं वाण दिसलं रे दिसलं की समोर जाऊन उभं राहायचं आणि विचारायचं, ''मराठी आहात...?''

''नाही, हिंदी...!''

''चालतंय की...'' संवाद साधण्याशी मतलब... आणि मग काय विचारता, असा मस्त ग्रुप जमला आमचा. सगळ्या सोसायटीत चर्चा. प्रभातफेरी, सायंमैफील, लहान-मोठ्या सहली, जुने-बैठे खेळ, सोसायटीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग, फोटो, आणि काय काय... बालपण आठवावं, अशी धमाल आणि फोनवर या सगळ्यांचं उत्साहानं वर्णन केल्यावर जुन्या सख्यांची लाडिक तक्रार ''आम्हाला विसरलीस हं तू...'' आमचा हा प्रौढ मैत्रिणींचा ग्रुप पाहून इथं राहावं लागणाऱ्या तरुण मैत्रिणीसुद्धा म्हणाल्या, ''काकू, आता आम्हीसुद्धा आमच्या पालकांना इथं बोलावू शकतो. नाही तर ते इथं यायला तयारच नसतात आणि आले तरी लगेचच परतीचं तिकीट काढूनच येतात.'' किती मोठी पावती होती ही...!

सुदैवाने यांनाही इथं मित्रांचा सहवास लाभला आणि माझी काळजी मिटली. करोनाच्या साथीनंतर काही मैत्रिणी इथून निघून गेल्या, पण पुन्हा पहिलाच फेडा वापरून नवीन मैत्रिणी मिळवल्याच आणि हो, चेन्नईला